**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत रोपवन संरक्षण व संगोपनाबाबतच्या नागपूर व बीड जिल्ह्यातील कामांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग (रोहयो)

शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.६४/मग्रारो-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २३ जून, २०१६

**संदर्भ :-**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा-२००५

२. शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. रोहयो-२००५/प्र.क्र.१९४/रोहयो-१०, दिनांक २३ डिसेंबर, २००५

३. शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/ प्र.क्र.२८/ रोहयो-१, दिनांक ३० जून, २०११

४. शासन निर्णय क्र. मग्रारो -२०११/प्र.क्र.८०/ रोहयो-१, दिनांक ०९ डिसेंबर, २०११

५. शासन शुध्दीपत्रक क्र. मग्रारो - २०१२/प्र. क्र.२८/रोहयो -१, दिनांक ११ डिसेंबर, २०१३

६. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. मगांराग्रारोहयो/प्र.क्र.६३/अ.का.१/ कावि ३३६/ २०१६, दिनांक ०२ मे, २०१६

७. जिल्हाधिकारी, बीड यांचे पत्र क्र.२०१६/मग्रारोहयो/तांत्रिक/प्र.क्र.७६, दिनांक ०६ मे, २०१६

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ अंतर्गत राज्यामध्ये मग्रारोहयो टप्प्याटप्याने सुरु करण्यात आली असून, दिनांक ०१ एप्रिल, २००८ पासून संपूर्ण राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भीय शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर, २००५ मधील अनुज्ञेय कामात रोपवाटिका व वृक्ष लागवड इत्यादींचा समावेश आहे.

त्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या हद्दीत करण्यात येणाऱ्या वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत रोपवनांचे संगोपन, देखभाल व संरक्षण करण्यासंदर्भात आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन दिनांक ३० जून, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे व दिनांक ११ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णय शुध्दीपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी, नागपूर व बीड यांच्या अनुक्रमे संदर्भाधीन क्र. ६ व ७ वरील पत्रांन्वये, दिनांक ३० जून, २०११ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आलेल्या रोपवन संगोपन व संरक्षणाच्या कामांची मुदत मार्च, २०१६ मध्ये संपुष्टात येत असल्याने, सदर कामांना जून २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली आहे. या जिल्ह्यांमध्ये सन २०१३-१४ मध्ये झालेल्या वृक्ष लागवडीचे, सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता, पावसाच्या आगमानापर्यंत संगोपन करणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन, शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नागपूर व बीड या जिल्ह्यांमध्ये संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३० जून, २०११ अन्वये सुरु असलेल्या व मार्च, २०१६ अखेर मुदत संपत असलेल्या रोपवन संरक्षण व संगोपनांच्या कामांना जून, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

जिल्ह्यामध्ये झालेल्या वृक्ष लागवडीच्या कामांची तपासणी करण्यात येऊन जिवंत राहण्याजोग्या झाडांचे संरक्षण व संगोपन, प्रचलित शासन निर्णयांद्वारे विहित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे करण्यात यावे.

**(वि. पु. काळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
३. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
५. सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई -३२
६. सर्व विभागीय आयुक्त.
७.आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८.आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर.
९. सर्व जिल्हाधिकारी. (बृहन्मुंबई वगळून)
१०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
११. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे(स्थानिक स्तर), पुणे.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर).
१४. संचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
१५. महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
१७. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
१८. संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे.
१९. संचालक, फलोत्पादन, पुणे.
२०. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
२१. सर्व गटविकास अधिकारी / सर्व तहसीलदार, सर्व प्रकल्प अधिकारी, जनजाती उपयोजना
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२३. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
२४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई.
२६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२७. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई( महाऑनलाईन प्रसिध्दीसाठी)
२८. उपसचिव, महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी योजना समिती, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
२९. निवडनस्ती, मग्रारो-१